पुढारी

# विद्यापीठाचे कामकाज पुढील आदेशापर्यंत बंद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी शासनाच्या वतीने विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. त्यास अनुसरून शिवाजी विद्यापीठाच्या वतीने अधिविभाग तसेच प्रशासकीय कामकाज पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

या कालावधीत घरातून आवश्यक ती शैक्षणिक कामे शिक्षकांनी व प्रशासकीय कामे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी करावीत. कार्यालयीन कामकाजाकरिता विद्यापीठ कार्यालयास एखाद्या शिक्षक, अधिकारी वा कर्मचाऱ्याची गरज भासल्यास अधिविभाग प्रमुख प्रमुख यांच्या आदेशानुसार संबंधितास कर्मचाऱ्यांना कर्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

Kolhapur Edition
16 Apr, 2020 Page No. 2
Powered by : erelego.com

पुढारी

# ‘कोरोना’चे संक्रमण रोखणाऱ्या अतिनील किरणांच्या टॉर्चची निर्मिती

## शिवाजी विद्यापीठातील प्रा. राजेंद्र सोनकवडे यांचे संशोधन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना आणि संशोधन सुरू असताना त्याचाच एक भाग म्हणून अतिनील किरणांचे टॉर्च शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागातील प्रा. राजेंद्र सोनकवडे यांनी तयार केले आहे. या टॉर्चच्या माध्यमातून कोरोना विषाणूंना निष्क्रिय करणे शक्य होणार असल्याचा दावा प्रा. डॉ. सोनकवडे यांनी केला आहे.

सध्या कोरोना विषाणूचा प्रसार झपाट्याने होत आहे. या विषाणूचे संक्रमण रोखणे हा एकमेव पर्याय आहे. कोरोना विषाणूवर अजून औषध मिळाले नाही; पण त्यांचे संक्रमण रोखण्यास हा टॉर्च उपयुक्त ठरणार आहे. दैनंदिन जीवन जगताना आपला विविध वस्तूंना स्पर्श होत असतो आणि त्यातूनच विषाणूंचे संक्रमण इतरांना होण्याची शक्यता असते.



### विषाणू निष्क्रिय करणे शक्य

सध्या कोरोना संसर्ग रुग्णाचा जेथे वावर झाला आहे, अशा अंतर्गत ठिकाणी या टॉर्चचा वापर करून विषाणू निष्क्रिय करता येतात. राज्याचे उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांनीही या संशोधनाचे कौतुक केल्याचे प्रा. सोनकवडे यांनी सांगितले.



एखादी वस्तू, भाजीपाला किंवा फळ या टॉर्चच्या संपर्कात आले आणि त्यावर अतिनील किरणांचा मारा झाला तर ‘आरएनए’ची रचनाच बदलली जाते. त्यामुळे तो विषाणू नामशेष होऊन जातो. विजेवर चालणारी ही बॅटरी असून हाताळण्यासाठी सोपी आहे. सॅनिटायझर टनेल निर्मिती करणारे प्रा. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची मुले अनिकेत सोनकवडे आणि पूनम सोनकवडे यांनी टॉर्च निर्मितीत सहभाग घेतला आहे. ‘बीएआरसी’चे माजी संचालक एम. आर. अय्यर यांचेही विशेष प्रोत्साहन त्यांना मिळाले आहे.

लोकमत

'केआयटी'चे पाऊल : लॉकडाऊनमध्ये तीन हजार विद्यार्थ्यांना दिलासा; शासन, विद्यापीठ नियमानुसार परीक्षा होणार

# अभियांत्रिकीची चाचणी, मूल्यमापन ऑनलाईन

संतोष मिठारी
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील लॉकडाऊनमध्ये अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण, त्यांची चाचणी, मूल्यमापन आणि निकाल ऑनलाईन जाहीर करण्याचे पाऊल कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या केआयटी महाविद्यालयाने टाकले आहे. त्यामुळे या महाविद्यालयातील तीन हजार विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

'केआयटी'मधील विविध एकूण नऊ विद्याशाखांमध्ये तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. सरकारचा लॉकडाऊनचा निर्णय झाल्यानंतर झूम अ‍ॅपच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक आणि विभागप्रमुखांची बैठक घेण्यात आली. सर्वानुमते ऑनलाईन अध्यापनाचा एक नियोजित आराखडा ठरविण्यात आला. त्याची अंमलबजावणी दि. १४ मार्चपासून सुरु केली. त्यानुसार प्रत्येक शिक्षकाने ऑनलाईन लेक्चर्स आणि ऑनलाईन अभ्यासासाठी साहित्य तयार करुन मुडल व यूट्यूबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले. त्याचे मूल्यमापन महत्त्वाचे होते. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या टेस्ट (चाचणी) मुडल प्लॅटफॉर्मवरुन घेण्यात आल्या. मध्य सत्र परीक्षेचे तपासलेले पेपर विद्यार्थ्यांना दाखविणे. त्यांचे काही आक्षेप असतील, तर त्यांची नोंद घेऊन ते दूर करण्यासह निकालही ऑनलाईन जाहीर करण्यात आला. एप्रिलच्या अखेरपर्यंत अभ्यासक्रम, चाचणी परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन पूर्ण करण्याचे नियोजन या महाविद्यालयाने केले आहे. शासनाच्या आणि विद्यापीठाच्या नियमानुसार परीक्षाच घेतली जाणार आहे.

## घरी बसून अभ्यास



लॉकडाऊनमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून 'केआयटी'ने उर्वरित अभ्यासक्रमाचे ऑनलाईन अध्यापन, तर मुडल प्लॅटफॉर्मवर चाचणी परीक्षा घेण्याचे काम सुरु केले. ही पद्धत प्रभावी ठरली आहे. विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार नाही. विद्यार्थ्यांच्या परीक्षा या सरकारच्या आदेश आणि विद्यापीठाच्या निर्णयानंतर होतील. त्यामुळे विद्यार्थ्यांनी घरी बसून अभ्यास करावा. ऑनलाईनच्या माध्यमातून ज्ञान आणि कौशल्य विकसित करावे, असे आवाहन केआयटीचे संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी यांनी केले आहे.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील लॉकडाऊनमुळे कोल्हापुरातील केआयटी महाविद्यालयाने तीन हजार विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण दिले जात आहे.

> 'लॉकडाऊन'मुळे जरी सुट्टी असली तरी ऑनलाईन शिक्षण, चाचणीमुळे कॉलेजमधील क्लासमध्येच असल्यासारखे वाटत आहे. सुट्टी पडल्याने शैक्षणिक नुकसान होणार की काय? असे मला वाटत होते. पण, ऑनलाईन पद्धतीद्वारे कॉलेजने आमच्या शिक्षण आणि अभ्यासात खंड पडणार नाही, याची काळजी घेतली आहे.
>
> - आदर्श चौगुले, विद्यार्थी, प्रथम वर्ष, बी. टेक. (कॉम्प्युटर सायन्स)

# विद्यापीठ कर्मचाऱ्यांना रोटेशन पद्धतीने ऑनड्युटी



प्रतिनिधी

कोल्हापूर

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊन वाढवण्यात आला आहे. विद्यापीठ कर्मचाऱ्यांनी ३० एप्रिलपर्यंत 'वर्क फ्रॉम होम' काम करायचे असले तरी ॲकॅडमिक कामासाठी रोटेशन पद्धतीने आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांना ऑनड्युटी काम करावे लागणार आहे, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

लॉकडाऊनच्या काळात विद्यापीठातील कामकाज बंद आहे. पण ॲकॅडमिक कामे मात्र वर्क फ्रॉम होम पद्धतीने केली जात आहेत. सध्या सुरक्षा रक्षक, वसतिगृहातील अधिक्षक, इलेक्ट्रिक विभागातील कर्मचारी, पाणीपुरवठा, माळी असे दररोज ४० कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच विभागप्रमुखांच्या आदेशानुसार काही प्राध्यापकही घरात बसून ऑनलाईन पध्दतीने काम करीत आहेत. लॉकडाऊनच्या कालावधीत आवश्यकतेनुसार प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विद्यापीठ काम करण्यास उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

# पर्यावरणाचा समतोल राखण्याचे आव्हान

**अमोल सावंत : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : कोरोनाच्या लॉकडाउननंतर कोल्हापूर जिल्हा अधिक समृद्ध अन् शांततेचं लेणं अनुभवत आहे. निळेभोर आकाश अन् स्वच्छ हवेचे प्रवाह सर्वत्र वाहत आहेत. पक्षी-प्राण्यांना निवांतपणा मिळाला आहे. मानवी हस्तक्षेप तर अजिबात जाणवत नाही. कितीतरी वर्षांनंतर हा अनुभव चराचर सृष्टीत उतरलेला दिसत आहे; पण कोरोनाच्या संकटाची तीव्रता कमी झाल्यानंतर तो अनुभवायला मिळणार का? असा प्रश्नही उपस्थित होतो. यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्याचे आव्हान आपल्यासमोर असेल.




शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने केलेल्या पाहणीत शहरात हवेचे प्रदूषण ५० टक्क्यांनी घटलेले आढळले. शिरोली एमआयडीसी, गोकुळ शिरगाव एमआयडीसीतील घरघर थांबली आहे. हवा, पाणी, जमिनीच्या प्रदूषणात कमालीची घट जाणवत आहे. कचऱ्याचे प्रमाण घटले आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उन्हाळ्याला लवकर सुरवात झाली. दुपारच्या वेळेत तापमानाचा पारा ३७ ते ४० अंशांपर्यंत गेल्याची नोंद दिसते. असे असूनही उकाड्याची तीव्रता कमी आहे; कारण वाहने रस्त्यावर नसल्याने हवेतील कार्बनचे प्रमाण कमी झाले. औद्योगिक वसाहतीमध्ये येणारे सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी सध्या बंद आहे. परिणामी, तुलनेत पंचगंगा नदीचे पात्र स्वच्छ दिसत आहे. सेंद्रिय पदार्थ, प्लास्टिक कचरा वाहून नेणारी गटारे तुंबत नाहीत.

मानवी हस्तक्षेप कमी झाल्याचा परिणाम निसर्गातील सर्व घटकांवर जाणवत आहे. पेट्रोल-डिझेलचा वापर तुलनेने कमी झाला. आवाजाची तीव्रता सर्वत्र कमी झाल्याने पक्ष्यांचे मुक्त आकाशात उडणारे थवे, निसर्गातील प्राणी-पक्ष्यांनी मोकळा श्वास घेतला आहे.

**"लॉकडाउनमुळे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम जाणवत आहे. हवा स्वच्छ झाली. प्रदूषके कमी झाली. आवाज कमी झाला. पाण्याची नितळता जाणवत आहे. आम्ही शिवाजी विद्यापीठातील प्रयोगशाळेत पाण्याचे पृथक्करण करत आहोत. जंगलात, गावात, शहरात शांतता अनुभवायला येत आहे. हीच शांतता निसर्गामध्येही दिसत आहे."**

– डॉ. पी. डी. राऊत, पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ